## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची गुरुवार दि. १२ ऑगस्ट २००९ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ११९ वी बैठक बुधवार दि. १२ ऑगस्ट २००९ रोजी सकाळी ११.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. आमदार श्री. सचिन अहिर | सभापती |
| २) | मा. श्री. सुभाष हजारे, भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३) | मा.आमदार श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ४) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ६) | मा.श्री.कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ७) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ८) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ९) | मा.श्री.हेमराज शहा | सदस्य |
| १०) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ११) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १२) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्या |
| १३) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| १४) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १५) | मा.श्री.तारिक फारुकी | सदस्य |
| १६) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १७) | उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १८) | कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव | निमंत्रक |
| १९) | श्री.अनिल देशमुख, निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस मा.सभापती यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सहमुख्य अधिकारी श्री.काळमपाटील यांच्या वडीलांच्या दुःखद निधनाबद्दल शोक व्यक्त करुन त्यांच्या वडीलांच्या आत्म्यास सुख, शांती लाभो अशी इच्छा व्यक्त केली. सचिव यांनी उपस्थित मा.सभापती, मा.उपसभापती व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा.सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक - ११९.१**

विषय - दि.३०/०६/०९ रोजी झालेल्या ११७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते १५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर कार्यवृत्तांतावर चर्चा होत असताना सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी कार्यवृत्तांतातील पान क्र.२ वरील परिच्छेद क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे बँकेमार्फत भाडे जमा करण्याबाबत काय कार्यवाही झाली, अशी विचारणा केली. त्यावर श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी असे सांगितले की, या बाबत निर्णय घेण्याकरीता प्रस्ताव मंडळाकडून वित्त नियंत्रक/प्रा.यांचेमार्फत मा.उपाध्यक्ष/प्रा.यांचेकडे सादर केला आहे.त्यावर लवकरच निर्णय होईल व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. यावर मा.सभापती यांनी लवकर मंजूरी घेवून अंमलबजावणी करा, अशा सूचना दिल्या.

तसेच सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी कार्यवृत्तांतातील पान क्र.२ वरील परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मुख्यमंत्री महोदयांची कार्यक्रमास वेळ मिळण्याबाबत बराच कालावधी जर लागणार असेलतर, मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी व मा.सभापती यांचेहस्ते भूमिपुजन करण्याचा कार्यक्रम घेण्यात यावा, असे सूचविले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी कार्यवृत्तांतातील पान क्र.२ वरील परिच्छेद क्र.३ मध्ये सन्मा. सदस्य श्री.लष्करी यांनी सं.शि.तील गाळे कोणाला वितरीत केले आहेत, त्यांची नावे व फोटो इ.माहिती जाहिरपणे लावण्याबाबत मागील बैठकीत केलेल्या सूचनेबाबत काय कार्यवाही झाली अशी विचारणा केली असता, यासंदर्भात सहमुख्य अधिकारी यांनी सदर सूचना स्तुत्य असून, त्यावर प्रायोगीक तत्वावर एका संक्रमण शिबीरात लवकरच कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी कार्यवृत्तांतातील पान क्र.३ वरील परिच्छेद क्र.१ मध्ये ज्या २३६ व्यक्तींचा उल्लेख आहे, त्यातील नेमक्या किती व्यक्तींवर अपिलेट कोर्टात केसेस् चालू आहेत, अशी विचारणा केली. यावर सहमुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सर्वच व्यक्तींवर अपिलेट कोर्टात केसेस् चालू आहेत. सभापती यांनी असे सांगितले की, मंडळाच्या अधिका-यांनी अयोग्यरित्या गाळे वितरीत केले होते. त्या नंतर त्यांना घुसखोर म्हणून जाहिर केले, कारण त्या व्यक्ती १५ ते २० वर्षे त्या गाळयात रहात आहेत, ते घुसलेले नाहीत, म्हणून त्यांच्यावर वेगळा विचार करायला पाहिजे. त्यांच्याकडून काही दंडात्मक रक्कम घेऊन नियमित करण्याचा प्राधिकरणाचा निर्णय झाला होता. सदर निर्णय नंतर रद्द झाला कारण म्हाडाचे नुकसान होत आहे. त्या नंतर आचारसंहिता लागली. अशा प्रकारे बराच कालावधी लोटला आहे. त्यावर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी अशी विचारणा केली की, या केसेस्ला आपल्या कार्यालयाकडून कोणी उपस्थित रहातात का ? यावर श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी असे सांगितले की, या अपिलेट केसेस्ला विधी सल्लागार/प्रा.कार्यालयातील प्रतिनिधी आणि संबंधित मिळकत व्यवस्थापक आपल्या कार्यालयाकडून हजर असतात. ३१ केसेस्मध्ये निर्णय झालेला आहे आणि २०५ मध्ये निर्णय व्हावयाचा आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी कार्यवृत्तांतातील पान क्र.३ वरील परिच्छेद क्र.३ मध्ये सन्मा. सदस्य श्री.लष्करी यांनी विचारणा केल्याप्रमाणे लॅमिनेटेड व्हेकेशन नोटीसचा नमुना तयार झाला किंवा नाही, असे विचारले. त्यावर नमुना व्हेकेशन नोटीस तयार झालेली आहे व त्यास अंतीम करुन पुढील कार्यवाही लवकरच करण्यात येईल असे सहमुख्य अधिकारी यांनी सांगितले. मा.सभापती यांनी याबाबत कार्यवाही आठ दिवसात करावी, असे सूचीत केले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी कार्यवृत्तांतातील पान क्र.३ वरील परिच्छेद क्र.४ मध्ये "बळजबरीने" ऐवजी "सक्तीने" असा बदल करावयास सांगितले. त्याप्रमाणे कार्यवृत्तांतात सुधारणा करण्यात यावी असे सूचीत केले. त्यास सर्वानुमते संमती दिली.

तसेच सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सूचना केल्यानुसार पृ.क्र.३ वरील तिस-या परिच्छेदामध्ये "डी" विभागातील फक्त "एका इमारतीची दुरुस्ती" या ऐवजी "इ.क्र.४८-५० स्लेटर रोडची दुरुस्ती" असा बदल करुन कार्यवृत्तांतात सुधारणा करावी असे ठरले. तसेच याबाबत विधी सल्लागार/प्रा.यांचेकडून काय कार्यवाही झाली,अशी विचारणा केली असता कार्यकारी अभियंता/डी-२ विभाग यांनी उपमुख्य अभियंता (द.) यांचेमार्फत प्रस्ताव सादर करावा, जेणेकरुन मुख्य अधिकारी कार्यालयामार्फत प्रस्ताव विधी सल्लागार यांचेकडे पाठविता येईल, असे मुख्य अधिकारी यांनी आदेश दिले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी कार्यवृत्तांतातील पान क्र.७ वरील विशेष निधीबाबत विचारणा केली. तसेच इमारतीच्या दुरुस्तीबाबत वापरण्यात येणा-या निधीचा रेकॉर्ड व्यवस्थीत ठेवण्यात येतो काय, अशी विचारणा केली असता, श्री.सेहगल, उपमुख्य अभियंता (द.) यांनी सविस्तर माहिती दिली व इमारतनिहाय रेकॉर्ड ठेवण्यात येतो असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी कार्यवृत्तांतातील पान क्र.८ वरील शेवटच्या परिच्छेदात इमारतीचे नाव किंवा इमारत क्रमांक नमूद करावे, असे सूचविले. त्या नुसार "एका इमारती" ऐवजी ४८-५० स्लेटर रोड असा बदल करावा, त्याप्रमाणे बदल करुन कार्यवृत्तांतात सुधारणा करावयाचे ठरले. तसेच सदर इमारतीची सद्यःस्थिती काय आहे, ती धोकादायक म्हणून घोषित केली आहे किंवा नाही याबद्दल कार्यकारी अभियंता यांनी माहिती द्यावी. कार्यकारी अभियंता, डी-२ विभाग यांनी अशी माहिती दिली की, सदर इमारत या वर्षी अति-धोकादायक म्हणून घोषित केलेली आहे. त्यातील भाडेकरुंनी वाढीव रक्कम भरण्याची सहमती दर्शविलेली आहे. इमारत पुनर्विकास प्रस्ताव सादर करणार असे पत्र देखील भाडेकरुंनी दिलेले आहे. दुरुस्तीचे कामदेखील करण्यास सहकार्य करत नाहीत. या बाबत मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनीदेखील लवकर निर्णय घ्या असे सूचित केले. या अनुषंगाने मा.मुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अभियंता (द.) यांना इमारतीची पहाणी करुन योग्य तो निर्णय लवकरात लवकर घ्यावा असे आदेश दिले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी वाकडी चाळीबद्दल काय कार्यवाही झाली, अशी विचारणा केली होती, त्याबद्दल कार्यवृत्तांतात नोंद नसल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यावर चर्चेअंती खालीलप्रमाणे नोंद घेऊन कार्यवृत्तांतात सुधारणा करण्याचे ठरले. "वाकडीचाळ" च्या पुनर्विकास योजनेचे पुढील कार्यवाहीबाबत मा.सदस्य श्री.शिरीषकर यांनी विचारणा केली. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असून न्यायालयाचे अंतीम आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सन्मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी सर्व सदस्यांना प्रवासभत्ता देण्यात येणार आहे असे सांगितले, तसेच आजपर्यंतची थकबाकीसुध्दा मिळणार आहे, याबद्दल मा.मुख्य अधिकारी व मा.सभापती यांचे सर्व सदस्यांच्यावतीने आभार मानले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी पृ.क्र.१३ वरील रु.२०००/- प्रती चौ.मी.प्रस्तावीत दुरुस्ती मर्यादा लागू करावयाच्या प्रस्तावात माहिती एकाच फॉरमॅटमध्ये संबंधित दुरुस्ती विभागांनी द्यावी, अशी

असे स्पष्ट केले की, या बाबत परिपत्रक काढून संबंधितांना आदेश दिले जातील व या पुढील बैठकीत त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या.

वरीलप्रमाणे सविस्तर चर्चेअंती दि.२८/७/०९ रोजी सकाळी ११.०० वाजता झालेल्या ११८ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक - ११९.२**

विषय - दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.१७ ते २७ वर सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९/९९१**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "ब" नुसार एकूण ६७ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१३,४६,२०,९५२/- (रुपये तेरा कोटी सेहचाळीस लक्ष वीस हजार नऊशे बावन्न फक्त)एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.५,५१,०३,४८५/- (रुपये पाच कोटी एक्कावन्न लक्ष तीन हजार चारशे पंच्च्याऐंशी फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - ११९.३**

विषय - उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.२९ ते ३३ वर सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव क्रमांक - ११९/९९२**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "ब" नुसार एकूण ३९ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१,९६,८२,७७२/- (रुपये एक कोटी शहाण्णव लक्ष ब्याऐंशी हजार सातशे बहात्तर फक्त)एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,२२,५५,०९९/- (रुपये एक कोटी बावीस लक्ष पंचावन्न हजार नव्याण्णव फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - ११९.४ (१)**

विषय - भूकर पहाणी क्र.३९६ माझगांव विभाग, उपकर क्र.इ-६१८० (१), इ.क्र.१६५-१३९ए आणि १३९बी, पभातवाडी, सेठ मोतीशा लेन, माझगांव, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.३५ ते ३७ वर सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. भूकर पहाणी क्र.३९६ माझगांव विभाग, उपकर क्र.इ-६१८० (१), इ.क्र.१६५-१३९ए आणि १३९बी, पभातवाडी, सेठ मोतीशा लेन, माझगांव, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत सर्व सन्मा.सदस्यांनी अनुमती दिली व खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक - ११९/९९३**

भूकर पहाणी क्र.३९६ माझगांव विभाग, उपकर क्र.इ-६१८० (१), इ.क्र.१६५-१३९ए आणि १३९बी, पभातवाडी, सेठ मोतीशा लेन, माझगांव, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत सर्वानुमते ठरले.

**बाब क्रमांक - ११९.५**

विषय - दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.३९ ते ५९ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९/९९४**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "ब" नुसार एकूण ६३ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.११,९९,९६,७७०/- (रुपये अकरा कोटी नव्याण्णव लक्ष शहाण्णव हजार सातशे सत्तर फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.६,१९,७३,९६२/- (रुपये सहा कोटी एकोणीस लक्ष त्र्याहत्तर हजार नऊशे बासष्ट फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - ११९.६**

विषय - उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.६१ ते ७७ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९/९९५**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "ब" नुसार एकूण ३२ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.८,१३,१८,६९७/-(रुपये आठ कोटी तेरा लक्ष अठरा हजार सहाशे सत्त्याण्णव फक्त)एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.४,१४,००,७८२/- (रुपये चार कोटी चौदा लक्ष सातशे ब्याऐंशी फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - ११९.७ (१)**

विषय - दक्षिण परिमंडळातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरीबाबत.
कार्यकारी अभियंता/सी-१/२ विभागातील इमारतींना.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.७९ ते ८३ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९/९९६**

दक्षिण परिमंडळातील कार्यकारी अभियंता/सी-१/२ विभागातील उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाकरीता रु.१३,४२,३३७/- (रुपये तेरा लक्ष बेचाळीस हजार तीनशे सदोतीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - ११९.७ (२)**

विषय - दक्षिण परिमंडळातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरीबाबत.
कार्यकारी अभियंता/सी-३/४ विभागातील इमारतींना.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.८५ ते ८९ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९/९९७**

दक्षिण परिमंडळातील कार्यकारी अभियंता/सी-३/४ विभागातील उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाकरीता रु.०७,०३,१३४/- (रुपये सात लक्ष तीन हजार एकशे चौतीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - ११९.८**

विषय - इ.क्र.३८१ई काळबादेवी रोड या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेतील बदलाबाबत.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.९१ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९/९९८**

इ.क्र.३८१ई काळबादेवी रोड या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाच्या रु.१८,२०,५८५/- ऐवजी रु.२७,७३,५६८ व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१२,४४,७००/- इतक्या बदलातील रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - ११९.९**

विषय - इ.क्र.११७-११७बी दादीशेठ अग्यारी लेन, मुंबई-०२
म्हाडा अधि.१९७६ कलम ८८ (३) अ चे प्रमाणपत्र देणेबाबत.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.९३ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९/९९९**

इ.क्र.११७-११७बी दादीशेठ अग्यारी लेन, मुंबई-०२ म्हाडा अधि.१९७६ कलम ८८ (३) अ चे प्रमाणपत्र देणेबाबत सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - ११९.१०**

विषय - विशेष निधी अंतर्गत मा.आमदार यांच्या मतदार संघात करावयाच्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

१. मा.आमदार श्री.सचिन अहिर - नवीन वरळी मतदार संघ

२. मा.आमदार श्री.बशिर मुसा पटेल - उमरखाडी मतदार संघ

३. मा.आमदार श्री.सय्यद अहमद - नागपाडा मतदार संघ

४. मा.आमदार श्री.अरुण गवळी - चिंचपोकळी मतदार संघ

५. मा.आमदार श्री.राज के.पुरोहीत - मुंबादेवी मतदार संघ

६. मा.आमदार श्री.कालीदास कोळंबकर - नायगाव मतदार संघ

७. मा.आमदार श्री.सुरेश गंभीर - माहिम मतदार संघ

८. मा.आमदार श्री.दगडू सकपाळ - परळ मतदार संघ

९. मा.आमदार श्री.दत्ताजी नलावडे - वरळी मतदार संघ

१०. मा.आमदार श्री.सदा सरवणकर - दादर मतदार संघ

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.९५ ते १३५ वर प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत.

वरील प्रस्तावांपैकी अ.क्र.(१) वरील मा.आमदार व सभापती श्री.सचिन अहिर यांचे मतदार संघातील बैठकीमध्ये सादर केलेल्या एकूण ३७ कामांपैकी अ.क्र.२० ते ३७ वरती दर्शविलेल्या कामांना एकूण रु.२५ लक्ष इतक्याच रक्कमेच्या कामांना त्यांचे शिफारशीनुसार मंजूरी द्यावयाची असा बदल करण्यात आला.

चर्चेअंती विशेष निधी अंतर्गत मा.आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या अंदाजपत्रकांना उपलब्ध निधीच्या आधीन राहून (प्रत्येक प्रस्तावांसोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस) प्रशासकीय मान्यता देण्याचे तसेच ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी, असे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक - ११९/१०००**

विशेष निधी अंतर्गत मा.आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या अंदाजपत्रकांना उपलब्ध निधीच्या आधीन राहून (प्रत्येक प्रस्तावांसोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस) प्रशासकीय मान्यता देण्याचे तसेच ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक - ११९.११**

विषय - पुनर्रचना विभाग

१. इ.क्र.४९-५१, ५३-५५, ५७-५९, ४थी मरीन स्ट्रीट, सी विभाग, भूखंड पहाणी क्र. २६९,२७०,२७१ भुलेश्वर येथील संयुक्त पुनर्बांधणी योजनेस सुधारित प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.१३७ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९/१००१**

इ.क्र.४९-५१, ५३-५५, ५७-५९, ४थी मरीन स्ट्रीट, सी विभाग, भूखंड पहाणी क्र.२६९,२७०, २७१ भुलेश्वर येथील संयुक्त पुनर्बांधणी योजनेस सुधारित प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते देण्यात आली.

विषय -२. इ.क्र.३४-३४ए,कावासजी पटेल स्ट्रीट,फोर्ट,अ विभाग मुंबई येथील इमारतीची पुनर्बांधणी योजनेच्या कामाच्या निम्नतम निविदेस मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.१३९ ते १४१ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९/१००२**

इ.क्र.३४-३४ए,कावासजी पटेल स्ट्रीट,फोर्ट,अ विभाग मुंबई येथील इमारतीची पुनर्बांधणी योजनेच्या कामाच्या निम्नतम निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक - ११९.४**

विषय - पुनर्विकास
मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हकरत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

२. भूकर पाहणी क्र.८८ लोअर परेल विभाग,इ.क्र.३११-३१३,३१५,३१७-३१९,३२१,३१५-अे, ना.म.जोशी मार्ग, मुंबई-१३, दिन बिल्डींग

३. भूकर पाहणी क्र.२७२, परेल शिवडी विभाग,इ.क्र.२४-अे, डॉ.वाळींबे रोड, मुंबई-१२ नानाभाई चाळ.

४. भूकर पाहणी क्र.७/१८६५, भायखळा विभाग, इ.क्र.९-१३ रेड क्रॉस लेन, आग्रीपाडा, मुंबई बेने इजराईल बिल्डींग.

५. भूकर पाहणी क्र.२९०,गिरगांव विभाग, इ.क्र३४बी,मुगभाट लेन, मुंबई-०४, एकविरा सदन.

६. भूकर पाहणी क्र.११४८, गिरगाव विभाग, इ.क्र.११-१९, जालभाई स्ट्रिट (पाववाला स्ट्रीट) चर्नी रोड,मुंबई ताहेर बिल्डींग

७. भूकर पाहणी क्र.२०७५,भुलेश्वर विभाग, इ.क्र.२३ए,झावबावाडी, मुंबई-०२, झावबा चाळ.

८. भूकर पाहणी क्र.६४०,टी.पी.एस-४, माहिम विभाग,इ.क्र.१२-१२अे,१४-१४अे-१६-१६अे, सीतलादेवी टेम्पल रोड, मुंबई-१६, आनंद भवन

९. भूकर पाहणी क्र.१३१,टी.पी.एस-४, माहिम विभाग,इ.क्र.१९,राम मारुती रोड, दादर (प.), मुंबई-२८, राधा निवास

१०. भूकर पाहणी क्र.१०३० व १/१०३२,गिरगाव विभाग,इ.क्र.१९,खेतवाडी,१२वी गल्ली, मुंबई-०४ येथील लक्ष्मी निवास

११. भूकर पाहणी क्र.५३५ व ५३६, गिरगाव विभाग,इ.क्र.१६ व १८, सदाशिव क्रॉस लेन, गिरगाव मुंबई येथील पाटणेकर निवास व मेहता भुवन

१२. भूकर पाहणी क्र.१२५/१०,माटुंगा विभाग,प्लॉट क्र.१२६,इ.क्र.८ हिंदु कॉलनी रोड क्र.५, माटुंगा,मुंबई-१९ येथील वसंत व्हीला.

१३. भूकर पाहणी क्र.७७४,भायखळा विभाग,इ.क्र.१८-२०, कामाठीपुरा ५वी गल्ली.

१४. भूकर पाहणी क्र.२/३०१,लोअर परेल विभाग,इ.क्र.४०३-डी, डॉ.ई.मोसेस रोड, वरळी, मुंबई-१८,डायमन्ड चेंबर

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१४३ ते १९३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत, सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९/१००३**

मुंबई बेटावरील खालील १३ (अ.क्र.२ ते १४) मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

२. भूकर पाहणी क्र.८८ लोअर परेल विभाग,इ.क्र.३११-३१३,३१५,३१७-३१९,३२१,३१५-अे, ना.म.जोशी मार्ग, मुंबई-१३, दिन बिल्डींग

३. भूकर पाहणी क्र.२७२, परेल शिवडी विभाग,इ.क्र.२४-अे, डॉ.वाळींबे रोड, मुंबई-१२ नानाभाई चाळ.

४. भूकर पाहणी क्र.७/१८६५, भायखळा विभाग, इ.क्र.९-१३ रेड क्रॉस लेन, आग्रीपाडा, मुंबई बेने इजराईल बिल्डींग.

५. भूकर पाहणी क्र.२९०,गिरगांव विभाग, इ.क्र३४बी,मुगभाट लेन, मुंबई-०४, एकविरा सदन.

६. भूकर पाहणी क्र.११४८, गिरगाव विभाग, इ.क्र.११-१९, जालभाई स्ट्रिट (पाववाला स्ट्रीट) चर्नी रोड,मुंबई ताहेर बिल्डींग

७. भूकर पाहणी क्र.२०७५,भुलेश्वर विभाग, इ.क्र.२३ए,झावबावाडी, मुंबई-०२, झावबा चाळ.

८. भूकर पाहणी क्र.६४०,टी.पी.एस-४, माहिम विभाग,इ.क्र.१२-१२अे,१४-१४अे-१६-१६अे, सीतलादेवी टेम्पल रोड, मुंबई-१६, आनंद भवन

९. भूकर पाहणी क्र.१३१,टी.पी.एस-४, माहिम विभाग,इ.क्र.१९,राम मारुती रोड, दादर (प.), मुंबई-२८, राधा निवास

१०. भूकर पाहणी क्र.१०३० व १/१०३२,गिरगाव विभाग,इ.क्र.१९,खेतवाडी,१२वी गल्ली, मुंबई-०४ येथील लक्ष्मी निवास

११. भूकर पाहणी क्र.५३५ व ५३६, गिरगाव विभाग,इ.क्र.१६ व १८, सदाशिव क्रॉस लेन, गिरगाव मुंबई येथील पाटणेकर निवास व मेहता भुवन

१२. भूकर पाहणी क्र.१२५/१०,माटुंगा विभाग,प्लॉट क्र.१२६,इ.क्र.८ हिंदु कॉलनी रोड क्र.५, माटुंगा,मुंबई-१९ येथील वसंत व्हीला.

१३. भूकर पाहणी क्र.७७४,भायखळा विभाग,इ.क्र.१८-२०, कामाठीपुरा ५वी गल्ली.

१४. भूकर पाहणी क्र.२/३०१,लोअर परेल विभाग,इ.क्र.४०३-डी, डॉ.ई.मोसेस रोड, वरळी, मुंबई-१८,डायमन्ड चेंबर

**मा.अध्यक्षांच्या मान्यतेने आयत्यावेळी ठेवावयाचे विषय**

**बाब क्र.११९.१२**

दक्षिण परिमंडळातील एकूण (१०) कामांना रु.१,४४,६०,९२०/- इतक्या व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.८,६९,३६१/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मंजूरीकरिता बैठकीसमोर सादर करण्यात आला. त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक - ११९/१००४**

दक्षिण परिमंडळातील एकूण (१०) कामांना रु.१,४४,६०,९२०/- इतक्या व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.८,६९,३६१/- इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

मंडळाच्या सदस्यांना एम.आय.जी.मध्ये मेंबरशिप मिळणेबाबत मा.सदस्य श्री.लष्करी यांनी म्हाडामध्ये मुंबई मंडळाचे सदस्यांना एम.आय.जी.मध्ये मेंबरशिप दिलेल्या आहेत, त्याच धर्तीवर मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सदस्यांना एम.आय.जी.क्लबमध्ये मेंबरशिप मिळावी म्हणून शिफरस करण्यात यावी, असे सूचित केले.

यावर चर्चा झाली. सर्व सदस्य व मा.सभापती यांनी वरील सूचनेस संमती दर्शविली व मा.सभापती यांनी याबाबत प्रयत्न करावेत, अशा सूचना केल्या.

त्या अनुषंगाने मुख्य अधिकारी यांना मुंबई मंडळामध्ये या बाबत काय निर्णय झालेला आहे, याबाबत विचारणा करुन याबाबत शक्य असल्यास जरुर ती कार्यवाही करुन प्रयत्न करण्यात येतील असे सांगितले.

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिका-याचें आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहीर केले.

सचिव, मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी/दुवपु.मंडळ

मा.सभापती,मुं.इ.दु.व पु.मंडळ